**रे.मु.नं. ३८७/२०१७**
**संगीता वि. एकनाथ**
**नि.क्र.६३ लगत**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ः–**

**साक्षीदाराचे नावः– संगीता प्रकाश भोसले,**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर पुढील उलटतपास विधीज्ञ श्री. के.के.गलांडे यांचे मार्फतः–**

माझे ९ वी पर्यंत शिक्षण झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, साधारण ३५ वर्षांपुर्वी माझे लग्न झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाच्या वेळी माझे वय साधारण १६ वर्षे होते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर मी माझ्या पतीकडे नांदावयास गेले. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८.०४.२०१५ रोजी तहसिल कार्यालयामध्ये जमीनीचे वाटप करण्यात आले व त्या वाटपामध्ये एक जमीन मला देण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, त्या जमीनीची आजरोजी ७/१२ उता–यावर माझ्या नावाची नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती जमीन आजरोजी मी वहिवाटीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती जमीन मी प्रल्हाद शेळके या व्यक्तीस वाट्याने दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दहिगाव येथील जिल्हा सहकारी बँक येथे मी खाते उघडले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाटपात आलेल्या जमीनीच्या पिकाचे पैशाचे व्यवहार मी सदर बँकेतील माझ्या खात्यातुन करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गंगामई शुगर इंडस्ट्री या कारखान्यास अनेकवेळा माझा ऊस देखील गेलेला आहे.

०२. संगीता प्रकाश भोसले या नावाची केवळ एकच व्यक्ती दहिगाव या गावात आहे. माझे बँकेत खाते आहे. ते खाते दहिगाव येथील अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या बँकेत आहे. मी त्या बँकेत अनेकवेळा पैशाचे व्यवहार केलेले आहेत. मला सही करता येते. दहिगाव येथील गट क्र. २९२ ही जमीन माझ्या नावे आहे. त्या जमीनीचे क्षेत्रफळ ०१हे ००आर आहे. मी त्या जमीनीचा ७/१२ उतारा अनेकवेळा पाहिलेला

आहे. ती जमीन माझे वाटेकरी प्रल्हाद शेळके करतात. त्या जमीनीमध्ये मी ऊस हे पीक घेतले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.२९२ या जमीनीच्या ७/१२ उता–यावर फेर क्रमांक ७०७७ ने माझे नाव लागले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या फेरफार प्रमाणे माझ्या वडीलांनी तहसिल कार्यालयात दिलेल्या वाटप अर्जाप्रमाणे आमच्या जमीनीचे वाटप होवून सदर जमीन माझ्या नावे देण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.२९२/१ व गट क्र.२९२/२ या जमीनीचा सौदा माझे भाऊ भिमराज एकनाथ चव्हाण यांनी दि.०९.११.२००५ रोजी प्रदिप पन्हालाल राठी यांच्या बरोबर केलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या सौद्याप्रमाणे दि.२४.०४.२००६ रोजी गट क्र.२९२/२ ही जमीन अलका साहेबराव चव्हाण यांच्या नावे खरेदी करण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, त्या सौद्याप्रमाणे दि.२४.०४.२००६ रोजी गट क्र.२९२/२ पैकी व गट क्र.२९२/१ पैकी जमीन मिराबाई भिमराज चव्हाण यांच्या नावे खरेदी करण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, दि.२४.०४.२००६ रोजी सदर खरेदीखताकरीता मी शेवगाव सह दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये हजर होते.

प्रश्न – पुर्वीच्या सोद्याप्रमाणे दि.२४.०४.२००६ रोजी गट क्र.२९२/१ पैकी ०१हे ही जमीन प्रदिप राठी, पन्हालाल राठी, जमुनाबाई पन्हालाल राठी यांच्या कडुन सुरेखा रामहरी चव्हाण हिच्या नावे खरेदी घेण्यात आली होती?

उत्तर – हे म्हणणे खरे आहे.

प्रश्न – पुर्वीच्या सोद्याप्रमाणे दि.२४.०४.२००६ रोजी गट क्र.२९२/१ पैकी ०१हे ही जमीन प्रदिप राठी, पन्हालाल राठी, जमुनाबाई पन्हालाल राठी यांच्या कडुन माझ्या नावे खरेदी घेण्यात आली होती?

उत्तर – ती जमीन मी स्वतः विकत घेतली आहे.

प्रश्न – दि.०९.११.२००५ रोजी भिमराज एकनाथ चव्हाण व राठी कुटुंबीय यांच्या दरम्यान गट क्रमांक २९२/१ व गट क्र.२९२/२ या जमीनीसंदर्भात झालेल्या सौद्याच्या

अनुषंगाने राठी कुंटुंबीयाचे प्रमुख म्हणुन प्रदिप पन्हालाल राठी यांनी स्टॅम्प पेपरवर इसारपावती लिहुन दिली होती.

उत्तर – माझ्या भावाने सौदा केला होता. त्यामुळे त्याबाबत माझ्या भावाला माहित आहे. मी फक्त माझ्या वाट्याच्या जमीनीचे पैसे दिले.

०३. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखत नोंदवण्याकरीता दि.२४.०४.२००६ रोजी मी दुय्यम निबंधंक कार्यालय शेवगाव येथे आले होते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.२९२/१ व गट क्र.२९२/२ या जमीनीची एकत्रीत वहिवाट माझे भाऊ व वडील करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८.०४.२०१५ रोजी तहसिल कार्यालयातील वाटपाप्रमाणे एकत्र कुटुंबातील जमीनीतील माझा हिस्सा वेगळा काढुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, तो हिस्सा फेरफार क्र.७०७७ ने वेगळा काढुन दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे मी गट क्र.२९२ या जमीनीवर वहिवाट करते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, मी मालकी हक्काने ती जमीन वहिवाट करते. गट क्र.२९२ या जमीनीवर तहसिलदाराच्या आदेशाप्रमाणे माझे नाव लागले त्या विरुध्द मी कुठेही अपील केले नाही.

प्रश्न – भावीनिमगाव येथील गट क्र.६९/२ ही जमीन दि.२०/०३/१९९१ रोजी अलकाबाई साहेबराव चव्हाण यांनी विष्णु दगडु चव्हाण यांच्याकडुन खरेदी घेतली ?

उत्तर – हे मला माहित नाही.

प्रश्न – भावीनिमगाव येथील गट क्र.६९/३ ही जमीन दि.०३/०६/१९९६ रोजी भिमराज एकनाथ चव्हाण यांनी विष्णु दगडु चव्हाण यांच्याकडुन खरेदी घेतली ?

उत्तर – हे मला माहित नाही.

प्रश्न – भावीनिमगाव येथील गट क्र.६९/१ ही जमीन दि.२४/०९/२०१५ रोजी श्रीराम भिमराज चव्हाण यांनी पद्माबाई विष्णु चव्हाण यांच्याकडुन खरेदी घेतली ?

उत्तर – हे मला माहित नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, वरील जमीनी खरेदी घेतल्याचे मला माहित नसल्याचे कारण म्हणजे मी माझ्या पतीसोबत नांदत होते. हे म्हणणे खरे नाही की, खरेदी घेतलेल्या वरील जमीनीमध्ये मला वाटणी मागण्याचा हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की, वडीलोपार्जीत जमीनीमध्ये असलेल्या हिश्याप्रमाणे गट क्र.२९२ ही जमीन माझ्या नावे करण्यात आली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१५४, ६५, १५५, ६०, ५१, ६६ आणि ७२ या जमीनी वडीलोपार्जीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीनीमध्ये माझा हिस्सा होता त्यामुळे माझ्या नावे गट क्र.२९२, क्षेत्रफळ ०१ हेक्टर ही जमीन खरेदी करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, सन २००५–०६ सालामध्ये माझे मोठे भाऊ भिमराव आमच्या कुंटुंबाचे कर्ता म्हणुन काम पाहत होते. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.२९२ क्षेत्रफळ १ हेक्टर या जमीनीकरीता मी मोबदला दिला हे दाखवण्याकरीता माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्व जमीनीमध्ये हिस्सा मिळण्याबाबत खोटी मागणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.२९२ जमीनीच्या खरेदीकरीता मी पैसे दिले हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, दरम्यानच्या कालावधीमध्ये माझ्या पतीची आर्थिक परिस्थिती खराब झाल्याने मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीमध्ये माझा हिस्सा असल्याचे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना त्रास देण्याकरीता खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या गैरहजेरीत वाटप झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जबाब दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

KULKARNI DATTATRAYA RAMESH
Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2025.12.05 16:42:46 +0530

(डी.आर.कुलकर्णी)

दि.०५.१२.२०२५

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर

शेवगांव